**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिपत्याखालील कार्यालयातील गट-अ ते गट-क संवर्गातील पदे दिव्यांगासाठी सुनिश्चित करण्याकरिता समिती गठित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,**
**शासन निर्णय : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७०/नापु-१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०८ एप्रिल, २०२६.

**संदर्भ** :- १. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६
२. केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांची दि.०४.०१.२०२१ रोजीची अधिसूचना
३.दिव्यांग कल्याण विभागाचा शासन निर्णय क्र.दिव्यांग-२०२५/प्र.क्र२६/कार्यासन १/E १४५८४९५, दि.३.१२.२०२५.

**प्रस्तावना :**

दिव्यांग व्यक्ती अधिनियम, २०१६ च्या कलम ३३ (२) नुसार दिव्यांगासाठी पद सुनिश्चिती करण्यासाठी तज्ञ समितीची पुनर्रचना करणे व कार्यपद्धती विहित करण्याबाबत दिव्यांग कल्याण विभागाच्या दि.३.१२.२०२५ च्या शासन निर्णयान्वये कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्येक मंत्रालय विभाग यांनी त्यांच्या विभागांतर्गत तसेच अधिनस्त कार्यालयातील मंजूर पदांच्या संवर्गांमध्ये दिव्यांगांसाठी सुनिश्चिती करण्यासाठी दिव्यांग प्रवर्गातील किमान एक तज्ञ व्यक्ती/ प्रतिनिधीसह समिती स्थापन करण्याबाबत सूचित केले असून, अशी समिती केवळ विभागाच्या स्तरावर गठित करुन त्याचे अध्यक्ष विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव असतील, असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार अन्न , नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या अधिनस्त गट अ ते गट क संवर्गातील पदे दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने समिती गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३४ नुसार सरळसेवा व पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना चार टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. कलम ३३ अन्वये शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था, महामंडळे इ. मध्ये पदांचा आढावा घेऊन दिव्यांगांची पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दिव्यांगांसाठी पदसुनिश्चिती करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | अध्यक्ष | विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव |
| २. | सदस्य | खुद्द विभागातील दिव्यांग प्रवर्गातील कक्ष अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ अधिकारी ( तज्ञ व्यक्ती ) |
| ३. | सदस्य | संबंधित कामकाज हाताळणारे अवर सचिव/ उप सचिव/ सह सचिव |
| ४. | सदस्य | उप नियंत्रक शिधावाटप , नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई |
| ५. | सदस्य सचिव | विभागातील व अधिनस्त कार्यालयातील आस्थापनाविषयक बाबी हाताळणारे अवर सचिव/उप सचिव/ सह सचिव |

२. सदर समितीची कार्यकक्ष पुढीलप्रमाणे असेल:

I. समितीने सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, तसेच केंद्र शासनाने दिनांक ०४.०१.२०२१ रोजीच्या अधिसूचनेन्वये दिव्यांगांसाठी सुनिश्चित केलेली पदे आणि दिव्यांग व्यक्तींच्या रोजगारातील जागतिक मानके विचारात घेऊन त्यांच्या आस्थापनांतील विशिष्ट श्रेणीतील दिव्यांगत्वासाठी प्रत्येक/सर्व संवर्गाच्या योग्यतेचा अभ्यास करून विभागातील सर्व संवर्गासाठी पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे. याबाबत संदर्भाधीन क्र.३ येथील दि.३.१२.२०२५ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" प्रमाणे दिव्यांग कल्याण विभागास प्रस्ताव सादर करावा.

II. एखाद्या संवर्गासाठी पदसुनिश्चितीमधून सूट द्यावयाची असल्यास सदर समितीने त्याबाबतचा प्रस्ताव दिव्यांग कल्याण विभागास समर्पक कारणमीमांसेसह सादर करावा.

III. सदर समितीने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ३३(३) अन्वये, किमान ३ वर्षातून एकदा पदसुनिश्चिती केलेल्या संवर्गाचा आढावा घ्यावा.

IV. यापूर्वी एखादा संवर्ग लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांगांसाठी राखीव असल्यास सदर संवर्ग त्या लक्षणीय दिव्यांगांसाठी सुनिश्चित राहील.

V. जे पद निम्न स्तरावर (फिडर केडर) दिव्यांगांसाठी सुनिश्चित केले असेल अशा पदाच्या पदोन्नती साखळीतील सर्व संवर्ग सदर दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित राहतील. (If a post is identified in the feeder grade, all the posts in the promotional grade should also stand identified.)

३. सदर शासन निर्णय, केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांची दिनांक ०४.०१.२०२१ ची अधिसूचनेन्वये व दिव्यांग कल्याण विभागाच्या दि.३.१२.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेल्या सूचनेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०४०८११५१२८२३०६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHITAL ANAND RAMTEKE

Digitally signed by SHITAL ANAND RAMTEKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLY AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, 2.5.4.20=250b23140177f1b91b8d23d0003fea615e62e9fa665cd65cd822d17139dee73b, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7D5A263499F325CA90E9E04FA83D69E04FD5CB75F96BB3FC42610EB9D879192B, cn=SHITAL ANAND RAMTEKE
Date: 2026.04.08 11:53:23 +05'30'

**(शितल रामटेके)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा/ विधानपरिषद विधानमंडळ मुंबई
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई
७. अपर मुख्य सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, याचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे
११. सहसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, याचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१२. नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
१३. नियंत्रक वैधमापन शास्त्र, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१४. प्रबंधक राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई
१५. वित्तीय सल्लागार व उपसचिव, मुंबई
१६. ग्राहक कल्याण सल्लागार समिती, मुंबई
१७. सर्व उपायुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय,
१८. निवडनस्ती/नापु-१२